महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १९८ वे | दिनांक : १२/०७/२०२६ | वार : रविवार

# मोशी कचरा डेपो दुर्घटना; १६ जणांची सुटका, मृतांचा आकडा वाढला



पुणे : मोशी येथील कचरा डेपोत 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर 45 मीटर उंच कचऱ्याचा डोंगर कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेतील बचावकार्य सलग तिसऱ्या दिवशी युद्धपातळीवर सुरू आहे. ताज्या अपडेटनुसार, प्रशासनाला आतापर्यंत ढिगाऱ्याखालून 16 जणांना बाहेर काढण्यात यश आले आहे. मात्र, बाहेर काढण्यात आलेल्या अक्षय सावंत या कामगाराचा पिंपरी येथील वायसीएम (YCM) रुग्णालयात उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत अद्याप 7 कामगार बेपत्ता असून, त्यांचा शोध घेण्यासाठी एनडीआरएफ (NDRF) आणि प्रशासनाकडून शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी या संपूर्ण घटनेचा पुण्यामध्ये सविस्तर आढावा घेत, मृतांच्या कुटुंबीयांना सर्वतोपरी मदत करण्याचे आणि कचरा प्रक्रियेची प्रभावी व्यवस्था उभारण्याचे कडक निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

बुधवारी दुपारी घडलेल्या या दुर्घटनेनंतर बचाव पथकाने शर्थीचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. अत्याधुनिक कटरच्या साहाय्याने इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा स्लॅब पाडण्यात यश आले असून, आता पहिल्या मजल्याचा स्लॅब फोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. बेपत्ता असलेले आठही कामगार याच स्लॅबखाली अडकले असल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

इमारतीचा अस्थिर झालेला काँक्रिटचा भाग फोडण्यासाठी आणि आत जाण्यासाठी सुरक्षित मार्ग तयार करण्याकरिता 'डिमोलीशन एक्सकॅव्हेटर मशीन' घटनास्थळी आणण्यात आले आहे. या मशीनमुळे मोहिमेला वेग आला असून, आज रात्रीपर्यंत हे शोधकार्य पूर्ण होईल, अशी अपेक्षा प्रशासनाला आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी तळ ठोकून आहेत.

· काल (10 जुलै) रात्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे येथे या दुर्घटनेचा सविस्तर आढावा घेतला.

· कुटुंबीयांना मदत: दुर्घटनेतील मृतांच्या आणि अडकलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना प्रशासनाकडून आवश्यक ती सर्व मदत तात्काळ पोहोचवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

· बायोमायनिंगला गती: मोशी येथील 'लेगसी वेस्ट'च्या बायोमायनिंग प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

· कचरा प्रक्रिया व्यवस्था: दररोज साचणाऱ्या आणि प्रक्रिया न होणाऱ्या सुमारे 100 टन कचऱ्यावर तातडीने प्रक्रिया करण्यासाठी एक स्वतंत्र आणि प्रभावी व्यवस्था उभी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या बैठकीला आमदार महेश लांडगे, महापौर रवी लांडगे, पोलीस आयुक्त आणि महापालिका आयुक्त उपस्थित होते.मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या दुर्घटनाग्रस्त इमारतीबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. ज्या तीन मजली इमारतीत दुर्घटना घडली, त्यात एका कामगाराचा मृत्यू झाला आणि आठ कामगार ६५ तास अडकले होते. या इमारतीच्या केवळ तळमजल्यालाच महापालिकेकडून पूर्णत्वाचा दाखला देण्यात आल्याचे आता उघड झाले आहे.

# मराठवाडा पुन्हा हादरला; हिंगोलीत ३.५ रिश्टरचा भूकंप



**हिंगोली** : मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्याला पुन्हा एकदा भूकंपाचा जोरदार हादरा बसला आहे. आज सकाळी 11 वाजून 26 मिनिटांच्या सुमारास हिंगोली शहरासह वसमत आणि औंढा नागनाथ परिसरातील जमीन अचानक हादरली. नॅशनल सिस्मॉलॉजी सेंटरच्या (भूमापक केंद्र) माहितीनुसार, या भूकंपाची तीव्रता 3.5 रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली आहे. अचानक घरांचे पत्रे आणि घरातील भांडी वाजू लागल्याने नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आणि अनेकांनी सुरक्षेसाठी थेट रस्त्यावर धाव घेतली. सुदैवाने यात अद्याप कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळच्या सुमारास नागरिक आपापल्या दैनंदिन कामात व्यस्त असताना, 11 वाजून 26 मिनिटांनी जमिनीतून गूढ आवाज आला आणि जोरदार हादरा बसला. हिंगोली शहरासह शेजारील वसमत आणि औंढा नागनाथ तालुक्याला या भूकंपाचा सर्वाधिक फटका बसला. भूकंपाची तीव्रता 3.5 रिश्टर स्केल इतकी असल्याने हा धक्का बऱ्याच स्पष्टपणे जाणवला.

या भूकंपामुळे सुदैवाने अद्याप कोणत्याही प्रकारच्या जीवितहानी किंवा मोठ्या वित्तहानीची नोंद झालेली नाही. मात्र, भूकंपाचे धक्के वारंवार जाणवत असल्याने प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभाग सतर्क झाला असून, नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक ती खबरदारी घ्यावी आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दोन दिवसांपूर्वी मराठवाड्यातील ३ जिल्ह्यांमध्ये मध्यरात्री भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. हिंगोली, परभणी आणि नांदेड या तिन्ही जिल्ह्यांमधील अनेक भागांत मध्यरात्री १ वाजून ३७ मिनिटांनी भूकंपाचे हे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ४.७ इतकी नोंदवण्यात आली आहे. हिंगोलीतील शिरळी परिसरात ४.६ रिश्टर स्केलची नोंद झाली. या भूकंपाच्या धक्क्यांमुळे नागरिकांनी रात्र जागून काढली.

नांदेड शहरातील तरोडा नाका, मालेगाव, कावरानगर, निळा रोड या भागातील नागरिकांना भूकंपाचे धक्के जाणवले. हिंगोली जिल्ह्यात मागील काही वर्षापासून भूकंपाची मालिकाच सुरु आहे. सतत होणाऱ्या भूकंपामुळे नागरीक भयभित झाले आहेत. गुरुवारी ता. ९ पहाटे १ वाजून ३७ मिनिटांनी ४.६ रिश्टर स्केलचा भूकंप झाला असून शिरली (ता. वसमत) हे भूकंपाचे केंद्रबिंदू असून खोली १० किलोमिटर आहे. त्यानंतर दुसरा धक्का २.१५ मिनिटांनी ३.६ रिश्टर स्केल, २ वाजून १७ मिनिटांनी ३.९ रिश्टर स्केल, तर ३ वाजून २३ मिनिटांनी ४.१ रिश्टर स्केल भूकंपाची नोंद झाली असूनत त्याचे केंद्रबिंदू काकडदाभा (औंढा नागनाथ) असल्याचे स्पष्ट झाले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ जुलै २०२६


## माधवराव पाटील महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त व्याख्यान




**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते.कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. राजेंद्र गणापुरे म्हणाले की, 11 जुलै 1987 रोजी जगाची लोकसंख्या 5 अब्जांवर पोहोचली, ती ऐतिहासिक घटना लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्रातर्फे हा दिवस साजरा केला जातो. वाढती लोकसंख्या म्हणजे केवळ आकड्यांची वाढ नसून ती नैसर्गिक संसाधनांवरील मोठा ताण आहे. भारत हा सध्या सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेला देश आहे. त्यामुळे, लोकसंख्येची संख्या किती आहे, यापेक्षा ती लोकसंख्या किती कार्यक्षम आहे, हे अधिक महत्त्वाचे आहे.डॉ. गणापुरे यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, पदव्या घेण्यासोबतच आधुनिक तंत्रज्ञान, कोडिंग आणि डेटा सायन्ससारखी कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज आहे. तसेच, कुटुंब नियोजन, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरणाचे रक्षण आणि पाण्याची बचत यांसारख्या सामाजिक जबाबदाऱ्या तरुण पिढीने स्वीकारल्या पाहिजेत.यावेळी मंचावर प्रा. विश्वजीत अंबर, प्रा. डॉ. रविंद्र गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जयश्री सोमवंशी, डॉ. सुजित मठकरी, डॉ. रमेश आडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जयश्री सोमवंशी यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. सुजित मठकरी तर आभार डॉ. रमेश आडे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.फोटो ओळ : मुरुम येथील माधवराव पाटील महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. राजेंद्र गणापुरे; समवेत प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, डॉ. रविंद्र गायकवाड व अन्य.






## लेखक अय्युब पठाण विद्यार्थ्यांच्या भेटीला



**छत्रपती संभाजीनगर :** (प्रतिनिधी) बालानगर केंद्रांतर्गत दरेगाव ता. पैठण येथील जिल्हा परीषद उच्च प्राथमिक शाळेत नुकतेच इयत्ता चौथीच्या मराठी विषयांतर्गत 'लेखक आपल्या भेटीला' हा अभिनव व प्रेरणादायी उपक्रम आनंददायी शनिवारी रोजी उत्साहात पार पडला. .विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, पाठ्यपुस्तकातील साहित्यकृतीचा आशय अधिक प्रभावीपणे समजून घेणे आणि लेखकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. इयत्ता चौथीच्या मराठी विषयातील पाठ क्रमांक 3 'कौतुकाची थाप' या पाठाचे लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन लेखकांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत पाठामागील प्रेरणा, लेखनप्रक्रिया आणि वाचनाचे महत्त्व आणि कविता वाचन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना भरपूर हसविले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे विविध प्रश्न विचारले. लेखकांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी सर्व विद्यार्थ्यांना नियमित वाचन, लेखन आणि सर्जनशील विचारांची प्रेरणा दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम संस्मरणीय आणि ज्ञानवर्धक ठरला. यावेळी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री सुनील डोके तसेच शिक्षक श्री सुरेश सूर्यवंशी, कचरूलाल जैस्वाल, श्रीमती कल्याणी औटी, आणि विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ जुलै २०२६


## छत्री

बाबाने आणली
एक नवी छत्री
रंगाने काळी
मुलखाची भित्री

पाऊस आला की
डोक्यावर मिरवते
पाऊस थांबला
खांद्यावर बसते

खट्याळ वारा
करायचा खोड्या
बिचारी मारायची
कोलाट उडया

आकाराने ती
गोलच गोल
पावसाळ्यात वाटे
सर्वांना मोल

पावसाळ्यात असते
तिचेच राज्य
रक्षण करण्यासाठी
सदा सज्ज




**- रवींद्र व्ही. चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


## देवबाप्पा, तुझ्यासमोर चोरी

देवबाप्पा, तुझ्यासमोर चोरी,
तेव्हा तू कुठे होतास?
तुझ्या दारीच दरोडा पडला,
मूक साक्षीदार का होतास?

तुझे दरवाजे, तुझी आरती,
तुझ्याच समोर पाप घडले;
श्रद्धेच्या पवित्र अंगणात,
विश्वासाचे दिवे विझले.

दानपेटीचे कुलूप तुटले,
भक्तांची भावना लुटली;
काही मुठभर नाण्यांसाठी,
माणुसकी तुटली.

कपाळी गंध, गळ्यात माळा,हात
जोडून उभे राहिले;
रात्र पडता त्याच हातांनी,
देवघराचे कुलूप फोडले.

सोन्याच्या लोभापायी त्यांनी,
विवेकच गहाण ठेवला;
क्षणिक लाभाच्या हव्यासासाठी,
स्वतःचाच आत्मा विकला.

मंदिरातील मूर्ती फूटली,
घंटानादही थांबून गेला;
श्रद्धेच्या त्या भूमीवर,
स्वार्थाचा अंधार दाटून आला.

चोरी झाली देवाची नव्हे,
चोरी झाली विश्वासाची;
दरोडा पडला केवळ धनावर नाही,
तर भक्तांच्या निखळ भावनेवर.

आज प्रश्न देवाला नाही,
प्रश्न माणसाच्या मनाला आहे;
देव दगडात सुरक्षित असेल,
नसेल,
पण चारित्र्य कुठे हरवले आहे?

देवबाप्पा, तुझ्यासमोर चोरी,
इतिहास पुन्हा लिहिला गेला;
देवबाप्पा, तुझ्यासमोर चोरी,
इतिहास पुन्हा लिहिला गेला.

**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**

# देवगिरीत जेईई, एमएचटी-सीईटी व बारावी बोर्ड परीक्षेत प्रावीण्य मिळवलेल्या गुणवंताचा सत्कार सोहळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** देवगिरी महाविद्यालयात बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील JEE, MHT-CET व १२ वी बोर्ड परीक्षेत कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेत विशेष प्रावीण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा.आ.सतीश चव्हाण यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे प्रतिपादन केले विद्यार्थ्यांनो काळाचे आव्हान ओळखून मार्गक्रमण करा, देवगिरीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान असून या विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि सातत्य ठेवून मिळवलेले हे यश प्रेरणादायी असेच आहे. देवगिरी महाविद्यालयांने सातत्याने ग्रामीण विद्यार्थी केंद्रबिंदू मानून त्यांना सकस आणि पोषक वातावरण निर्माण करून देण्यासाठी अग्रक्रमाने विचार केला असून विद्यार्थी स्वतःच्या पायावर कसा उभा राहील हा दृष्टिकोन ठेवूनच संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पातळीवरील देवगिरीचे अनेक माजी विद्यार्थी विविध विभागात कार्यरत असून ही महाविद्यालयाच्या दृष्टीने अभिमानाची बाब असल्याचे सांगून देवगिरी महाविद्यालय हे नेहमीच मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने जे जगामध्ये उत्तम कोर्सेस आहे ते सर्व कोर्सेस महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे.देवगिरी महाविद्यालयाचा जेईई नीट सेलचे विद्यार्थी JEE Mains मध्ये अनुक्रमे सार्थक नाईक ९९.८९ %ile प्रथमेश दैठणकर ९९.७३%ile , वेदिका गोपाळे ९९.६३ %ile गुण मिळवले आहे.तर PCM ग्रुपमध्ये सर्वेश भोसले ९९.९१%ile , इशांत गवळी ९९.७६%ile अथर्व गिरी ९९.७५ %ile, PCB ग्रुपमध्ये कृष्णाली दहातोंडे, ९९.६०%ile मीनाली पाध्ये ९९.०७%ile संयुक्त गोस्वामी ९८.०७%ile गुण संपादन केले. तर बारावी बोर्ड परीक्षेत कला शाखेत अनुक्रमे दत्तू जाधव ९२.७१% सुहानी शिंदे ९२% युक्ता देशपांडे ९१.८३% ,वाणिज्य शाखेत स्वरा देशमुख,९७.६७% युग श्रॉफ ९७.३३% प्रीती मुळे ९७% तर विज्ञान शाखेत वेदिका गोपाळे ९३.३३% ग्रीष्मा चव्हाण ९०.१७% ईशा जमालपुरे ८९.६७% गुण प्राप्त केले. वेदिका गोपाळे व सार्थक नाईक यांचा आयआयटी कानपूर येथे जेईई ॲडव्हान्स मधून प्रवेश निश्चित झाला आहे. JEE ,MHT-CET व बारावी बोर्ड परीक्षेत परीक्षेमध्ये नेत्रदीपक यश मिळवलेल्या विद्यार्थी व पालकांचा सत्कार दि.१० जुलै २०२६ रोजी देवगिरी महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रवी पाटील होते तरउपप्राचार्य प्रा. अरुण काटे उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर हिवरे उपप्राचार्य प्रा.विजय नलावडे जेईई- नीट सेल संचालक प्रा. नंदकिशोर गायकवाड यांची उपस्थिती होती. विशेष म्हणजे या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयाच्या JEE, NEET सेलचे विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत. महाविद्यालयाचे JEE, NEET सेलचे हे चौथे वर्ष असून विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय सेलच्या नियमित तासिका, महाविद्यालयाने केलेलं अचूक नियोजन, महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या टेस्ट सिरीज व संस्थेच्या व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना दिलेल्या सुविधा याच्या एकत्रित प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी यश मिळाल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.अरुण काटे यांनी केले. कला व वाणिज्य विभागाच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे अहवाल वाचन उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर हिवरे यांनी केले. याप्रसंगी वेदिका गोपाळे, स्वरा देशमुख ,सृष्टी कौशल आणि पालक प्रतिनिधी म्हणून रवींद्र गोरे यांनी मनोगत व्यक्त केले.महाविद्यालयाचे CET मध्ये २९ JEE Mains मध्ये १२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहे. सूत्रसंचालन व आभार डॉ.शिवानंद भानुसे यांनी मानले.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103



**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

## श्रीराम मंदिर देणगीतील कथित अपहारप्रकरणी हिंगोलीत काँग्रेसचे "रघुपती राघव राजाराम" सत्याग्रह आंदोलन





**हिंगोली :** अयोध्या येथील श्रीराम मंदिर देणगीतील कथित अपहार प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार हिंगोली शहर काँग्रेस, जिल्हा काँग्रेस आणि युवक काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवार (दि. १० जुलै) रोजी हिंगोली येथे "रघुपती राघव राजाराम" सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.आंदोलनाची सुरुवात शहरातील गांधी चौक परिसरातील घडवाई हनुमान मंदिरात प्रभू हनुमानाचे दर्शन घेऊन करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात "रघुपती राघव राजाराम" या भजनाचे गायन करत प्रभू श्रीरामांच्या नामाचा जयघोष केला. त्यानंतर घडवाई हनुमान मंदिर ते गांधी चौक मार्गे हिंगोली शहर पोलीस ठाण्यापर्यंत पदयात्रा काढण्यात आली.यानंतर हिंगोली शहर पोलीस निरीक्षक यांना निवेदन देत श्रीराम मंदिर देणगीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "प्रभू श्रीराम हे मर्यादा, न्याय आणि सत्याचे प्रतीक आहेत. त्यांच्या नावाने देशभरातील कोट्यवधी रामभक्तांनी श्रद्धेने दिलेल्या देणगीचा पारदर्शक व उत्तरदायी हिशोब जनतेसमोर येणे आवश्यक आहे. महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या मार्गाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांनी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वाभिमानाच्या प्रेरणेने सत्यासाठीचा हा लढा सुरू राहील."या सत्याग्रह आंदोलनात जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष डॉ. सतीश पाचपुते, माजी जिल्हाध्यक्ष सुरेशआप्पा सराफ, शहर काँग्रेस अध्यक्ष मिलिंद उबाळे, प्रदेश सचिव प्रा. साहेबराव देवकते, माजी जिल्हा परिषद सदस्य प्राचार्य श्यामराव जगताप, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव बंटी नागरे, दतराव भवर जामठीकर, भीमशक्तीचे हिंगोली युवक जिल्हाध्यक्ष विशाल इंगोले, औंढा तालुका अध्यक्ष ॲड. प्रदीप पोले, सेवादल जिल्हाध्यक्ष सुदामराव खंदारे, बापुराव पाटील वडदकर, बाजीराव इंगोले, जुबेर मामू, एकनाथ शिंदे, अतुल नायक, किसनराव जुमडे, दत्तराव राठोड, विठ्ठल जाधव, हारुण पठाण, विठ्ठल मोहनकर, अनुप नायक, युसूफ पठाण, संजय राठोड, शेख अमन, सुमित शिंदे, त्र्यंबक जगताप यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## औराळा प्रा आ केंद्र च बनले जीवघेणे कर्मचाऱ्यांसह रुग्णांचे आरोग्य धोक्यात



**कन्नड :** कन्नड तालुक्यातील औराळा प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असून, याच इमारतीत दररोज प्रसूती, ANC तपासणी, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिरे, लसीकरण, बाह्यरुग्ण सेवा तसेच आपत्कालीन उपचार दिले जात आहेत. मात्र प्रत्येक पावसाळ्यात गळणाऱ्या छताखाली ही आरोग्यसेवा सुरू असल्याने रुग्णांसह डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या जीविताचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.या प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत 34 गावे आणि सुमारे 32 हजार लोकसंख्या येते. कन्नड शहरापासून सुमारे 22 किलोमीटर अंतरावर असल्याने हजारो नागरिकांसाठी हेच एकमेव विश्वासाचे आरोग्य केंद्र आहे.विशेष म्हणजे, पुरेसा कर्मचारी वर्ग नसतानाही उपलब्ध डॉक्टर व कर्मचारी नागरिकांना उत्तम आरोग्यसेवा देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत आहेत. मात्र इमारतीची अवस्था इतकी गंभीर झाली आहे की, इच्छा असूनही सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा देणे अनेकदा शक्य होत नाही.पावसाळ्यात संपूर्ण इमारतीत ठिकठिकाणी पाणी गळते. उपचार कक्ष, प्रसूती विभाग आणि रुग्ण बसण्याच्या जागांमध्ये पाणी साचते. अनेक ठिकाणी छताचे प्लास्टर कोसळले असून भिंतींना मोठ्या भेगा पडल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असलेली निवासी शासकीय क्वार्टर्सदेखील अतिशय जीर्ण अवस्थेत आहेत. गळती, पडझड आणि भेगांमुळे तेथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेलाही गंभीर धोका निर्माण झाला आहे.हजारो नागरिकांचे आरोग्य ज्या इमारतीवर अवलंबून आहे, तीच इमारत आज धोक्याची घंटा ठरत आहे. अशा परिस्थितीत उपचार देणे आणि उपचार घेणे, दोन्हीही धोकादायक बनले आहे.आता एखादी दुर्घटना घडल्यानंतर जागे होण्यापेक्षा, प्रशासनाने तातडीने औराळा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी नवीन इमारत मंजूर करून काम सुरू करावे, अशी नागरिकांकडून तीव्र मागणी होत आहे.

## शिक्षकाअभावी शिक्षण धोक्यात; विजय म्हस्के पाटील आक्रमक




**सिल्लोड :** तालुक्यातील वांगी खुर्द (उर्दू) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे.सध्या संपूर्ण शाळेचा गाडा केवळ एकाच शिक्षकाच्या भरवशावर सुरू असून,येथे तात्काळ पर्यायी शिक्षकाची नियुक्ती करावी,अशी मागणी केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी शिक्षणमंत्र्यांकडे ईमेलद्वारे केली आहे.या शाळेत एकूण ४८ विद्यार्थी शिक्षण घेत असून प्रशासकीय मंजुरीनुसार शिक्षकांची ४ पदे मंजूर आहेत.मात्र,येथे केवळ २ शिक्षक कार्यरत होते.त्यातील एक शिक्षक २ जुलैपासून प्रसूती रजेवर गेल्याने, सर्व वर्गांच्या अध्यापनाची आणि प्रशासकीय कामांची जबाबदारी एकाच शिक्षकावर आली आहे.एकाच शिक्षकाने सर्व वर्ग सांभाळणे अशक्य असल्याने विद्यार्थ्यांचा 'शिक्षणाचा हक्क' धोक्यात आला आहे. यापूर्वी स्थानिक पातळीवर गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देऊनही दखल न घेतल्याने ग्रामस्थ आणि पालकांमध्ये तीव्र असंतोष आहे.प्रशासनाने तात्काळ अतिरिक्त शिक्षकाची नियुक्ती न केल्यास पालकांसह शाळेला कुलूप लावून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा विजय म्हस्के पाटील यांनी दिला आहे.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ जुलै २०२६

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडीची दयनीय अवस्था; गटशिक्षणाधिकाऱ्यांनी केली पाहणी




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी येथील परिसरात 90 टक्के आदिवासी भाग आहे या भागात आदिवासी ठाकर,भिल्ल व बौद्ध ,बंजारा समाज राहतो या शाळेत मोठ्या संख्येने आदिवासी ठाकर, भिल्ल समाजाची मुलं आहेत शाळेची इमारत ही इ.स 1980 साली बांधण्यात आली होती ती आता मोडकळीस व अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असून छताला गळती, भिंतींना तडे , चिरलेले पत्रे अशी अवस्था झाली आहे आणि इ.स 2012-13 साली बांधण्यात आलेल्या इमारतींचे सुद्धा छत गळत आहे, छत खाली आले आहे आणि वर्गखोल्यांची दुरावस्था झाली आहे यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर गटशिक्षणाधिकारी श्रीमती श्रद्धा ताटे व केंद्रप्रमुख श्री हार्दे. सोबत श्रीमती गणगे यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.पाहणीदरम्यान शाळेतील वर्गखोल्या, छताची गळती, फुटलेले पत्रे, स्वच्छतागृहाची दुरावस्था परिसराची स्थिती तसेच विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींची माहिती घेण्यात आली. मुख्याध्यापकांच्या गैरहजेरी नंतर निर्माण झालेल्या पालकांच्या परिस्थितीचाही आढावा घेण्यात आला.मुख्याध्यापक लहाने यांची तात्काळ बदली करून नवीन शिक्षक देण्यात यावे अशी मागणी गटशिक्षणाधिकारी श्रीमती श्रद्धा ताटे यांच्याकडे पालकांनी, ग्रामस्थांनी तक्रार व विनंती केली आहे.शिक्षक आणि ग्रामस्थांनी शाळेच्या इमारतीची तातडीने चालू वर्गाच्या दुरुस्ती आणि जुन्या इमारती पाडूण नवीन इमारत उभारण्याची मागणी केली.गटशिक्षणाधिकारी श्रीमती श्रद्धा ताटे यांनी शिक्षकांकडून, पालकांकडून आवश्यक माहिती घेत शाळेतील समस्या वरिष्ठ स्तरावर मांडून योग्य तो प्रस्ताव पाठविण्यात येईल, तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील,असे आश्वासन दिले.त्याचबरोबर विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आणखी प्रयत्न करावे असे शिक्षकांना सांगितले.ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन शाळेच्या नविन इमारतीच्या आणखी नवीन इमारती बांधण्यात यावे तसेच पालकांनी मुख्याध्यापक लहाने यांच्या बाबतीत तातडीने बदली करून नवीन शिक्षक देण्याची मागणी केली आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी श्रद्धा ताटे यांनी विद्यार्थ्यांसोबत चर्चा करत खिचडी चा आस्वाद घेतला शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा शाळेचे सहशिक्षक श्री भालेराव,श्री गालफाडे सहशिक्षिका श्रीमती घोरपडे, श्रीमती साबळे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश पवार उपाध्यक्ष वंदना मेंगाळ पालक व ग्रामस्थ बबन कातवारे, अंकुश मेंगाळ,बाळू मधे सनिराम गावंडे, वाळूबा मधे,वाळूबा कातवारे,शाम भांगारे,पुनम मेंगाळ,शांताराम डोके आदि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी /१२ वी पास

SANITARY HEALTH INSPECATOR
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी /१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : Any B.Sc.

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी १२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी १२ वी पास

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc
(Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी, १२ वी पास

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

DIALYSIS TECHNICIAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी / १२ वी पास

O.T.TECHINICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी १२ वी पास

ADMISSION OPEN

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903